राज्यातील अनुदानित अशासकीय संस्थेतील
सर्व कनिष्ठ लिपिक-टंकलेखक/ भांडार
लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ
वेतनश्रेणी रुपये २४००/- ग्रेड पे देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक : व्हीओसी- २०१५ /प्र.क्र.३२/व्यशि-४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय मुख्य, मुंबई -४०० ०३२.
दिनांक - १८ सप्टेंबर, २०१९.

<u>वाचा</u>:- शासन शुध्दीपत्रक कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
क्रमांक व्हीओसी-२०१५/प्र.क्र.३२/व्यशि-४, दि.२ एप्रिल, २०१६.

प्रस्तावना :-

अशासकीय अनुदानित संस्थेतील कनिष्ठ लिपिक-टंकलेखक/ भांडार लिपिक कर्मचाऱ्यांना पात्रता व पद रिक्ततेनंतर वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती देण्यात येते. या कर्मचाऱ्यांना त्यांच्या १२ वर्षाच्या सेवेनंतरही पदोन्नतीसाठी पद (वरिष्ठ लिपिक) उपलब्ध होत नसल्यास कालबध्द पदोन्नतीअंतर्गत या पदाची वरिष्ठ वेतनश्रेणी / ग्रेड पे देण्यात येते. या पदोन्नतीच्या वरिष्ठ लिपिक पदाचे ग्रेड पे (सहाव्या वेतन आयोगानुसार) रुपये २४००/- आहे.

पदांच्या आढाव्यानंतर (उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा दि.२२.५.२००८ चा शासन निर्णय) वरिष्ठ लिपिक पदांची संख्या ३३ वरुन ८ झालेली आहे. सदर पदे मुंबई विभागातील काही ठराविक ८ संस्थेतच आहे. त्यामुळे मुंबई विभागातील इतर संस्थेत तसेच इतर विभागात (नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद व पुणे) वरिष्ठ लिपिकाची पदे उपलब्ध/ मंजूर नाहीत. या सर्व विभागातील पात्र कनिष्ठ लिपिक- टंकलेखक/ भांडार लिपिक कर्मचाऱ्यांना (१२ वर्षानंतर) रुपये २४००/- ग्रेड पे देण्यात आला आहे / देण्यात येत होता. तथापि, विभागाच्या दि.२ एप्रिल, २०१६ च्या शासन निर्णयानुसार रुपये २४००/- ग्रेड पे तर एकाकी पदासाठी रुपये २२००/- ग्रेड पे दर्शविण्यात आला आहे. त्यामुळे काही विभागात १२ वर्षानंतर वरिष्ठ वेतन म्हणून रुपये २४००/- ग्रेड पे तर काही विभागात रुपये २२००/- ग्रेड पे कनिष्ठ लिपिक- टंकलेखक भांडार लिपिक कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. याप्रमाणे विभाग स्तरावरील भिन्न कार्यवाहीमुळे कर्मचाऱ्यांच्या मनात अन्याय झाल्याची भावना निर्माण होऊन काही कर्मचाऱ्यांनी न्यायालयाकडे दाद मागितली असून उर्वरित कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संघटनेने शासनाकडे दाद मागितली आहे. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन राज्यातील अनुदानित अशासकीय संस्थेतील सर्व कनिष्ठ लिपिक-टंकलेखक/ भांडार लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी रुपये २४००/- ग्रेड पे देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

कनिष्ठ लिपिक- टंकलेखक/ भांडार लिपिक, वरिष्ठ लिपिक ही पदे संस्था स्तरावर असून वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती त्याच संस्थेतील कनिष्ठ लिपिक- टंकलेखक/ भांडार लिपिक कर्मचाऱ्यांना देण्यात येते. इतर संस्थेत असे वरिष्ठ लिपिक पद नसल्यास पदोन्नतीचे पद उपलब्ध होत नाही. त्यामुळे सदर पदांना काही विभागात एकाकी ठरविणे व त्यासंदर्भात भिन्न -भिन्न कार्यवाही करणे उचित वाटत नाही. पदांच्या आढाव्यानंतर अशी परिस्थिती उद्भवली असल्याने व राज्य स्तरावर समान न्याय देणे अपेक्षित असल्याने, वाचा येथील क्र. व्हीओसी-

२०१५/प्र.क्र.३२/व्यशि-४, दि.२ एप्रिल, २०१६ चा शासन निर्णयातील या पदांच्या एकाकी पदांसाठी ग्रेडवेतनचा भाग वगळून पूर्वीप्रमाणेच म्हणजे दि.१.१.२००६ पासून राज्यातील अनुदानित अशासकीय संस्थेतील सर्व कनिष्ठ लिपिक-टंकलेखक/ भांडार लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांना वरीष्ठ वेतन श्रेणी म्हणून रुपये २४००/- ग्रेड पे देण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.८.३.२०१९ रोजीच्या अभिप्रायास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२११७५२११५५०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh
Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2019.09.21 17:40:45 +05'30'

(संतोष रोकडे)
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई- १
२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुबई/महाराष्ट्र-२ नागपूर
३. अधिदान व लेखाधिकारी/ निवासी लेखाधिकारी, मुंबई
४. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (संचालनालयामार्फत)
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. सर्व सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ नाशिक/ पुणे/ अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर (संचालनालयामार्फत)
१०.सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालये (संचालनालयामार्फत)
११.सर्व मुख्याध्यापक, शासकीय/ अशासकीय अनुदानित तंत्र माध्यामिक/ उच्च माध्यमिक विद्यालये (सहसंचालकामार्फत प्रती)
१२.कौशल्य विकास व उद्योजकता विभागातील सर्व व्यशि कार्यासने,
१३. निवडनस्ती व्यशि-४.